जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 JUN 2018
सकाळ


# स्किल बेस्ड अभ्यासक्रम हाउसफुल्ल

## एकोणतीस अभ्यासक्रमांतून विद्यार्थ्यांनी दिला करिअरला आकार

**संदीप खांडेकर :** सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : तुम्ही कितवीपर्यंत शिकलात? पाचवी, आठवी, दहावी की बारावीपर्यंत? हे शिक्षण कमी वाटत असेल, तर शिक्षणातून करिअरचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात सूत्रसंचालन, इव्हेंट मॅनेजमेंट, ग्रंथालय व्यवस्थापन असे एकोणतीस स्किल बेस्ड अभ्यासक्रम हाऊसफुल्ल आहे. या विभागाने गेल्या वर्षभरात १८ लाख हजार रुपयांची कमाई केली आहे.

आजीवन विभागात तेरा अभ्यासक्रम चालवले जातात, तर उर्वरित अभ्यासक्रम विद्यापीठाशी संलग्नित सुमारे सत्तर महाविद्यालयांत चालविले जातात. बालवाडी शिक्षिका शिक्षण, ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद, प्रिरेशन ऑफ हाऊसहोल्ड केमिकल्स, ट्रॅव्हल अँड टुरिझम, इंट्रोडक्शन टू इनमक टॅक्स, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, हिंदी अनुवाद, बेसिक कोर्स इन योगा, मुद्रितशोधन, मोडी,



टॅली, योग, व्यक्तिमत्त्व विकास, संगीत, गायन, वादन, रोपवाटिका तंत्र, योग व निसर्गोपचार, औषधी वनस्पतींची ओळख, सुगंधी व औषधी वनस्पती, रंगभूमी आणि संभाषण कौशल्य, मानवी हक्क, समाजकार्य शिक्षण, फॅशन डिझायनिंग, विक्रेता प्रशिक्षण, पाश्चिमात्य व लोकनृत्ये, वस्तुसंग्रहालय व्यवस्थापन, ऐतिहासिक कागदपत्रांची जपणूक व संरक्षण अशा २९ अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा आहे.

ज्येष्ठ नागरिक, ग्रामीण व झोपडपट्टीतील महिला, मागास जाती-जमाती, अर्धशिक्षित, बेरोजगार, शाळाबाह्य युवक, महाविद्यालयीन युवक-युवती आदी घटकांना केंद्रस्थानी ठेवून अभ्यासक्रम शिकवले जातात. पाचवी, सातवी, आठवी, दहावी व बारावीपर्यंत शिकलेल्या सर्व घटकांना या अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो. अभ्यासक्रमानुसार शुल्क आकारले जाते. दहा दिवस, पंचेचाळीस दिवस, चार महिने, तीन महिने, सहा महिन्यांपर्यंतच्या कालावधीचे अभ्यासक्रम आहेत. रोखे बाजार व्यवहार, व्यावसायिक दृष्टिकोन विकास, जेंट्स ब्युटी पार्लर हे अभ्यासक्रमही शिकवले जातात.

७१
एकूण अभ्यासक्रम

२९
हाउसफुल्ल चालणारे

वर्षभरातील कमाई
१८ लाख ४१ हजार

**स्किल बेस्ड अभ्यासक्रमांतून विद्यार्थ्यांनी स्वतःचा विकास घडवावा. कमी शुल्कात अभ्यासक्रम शिकवले जातात.**
**-डॉ. सुमन बुवा** (संचालिका, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUN 2018
लोकमत

# 'एम. एस्सी.'च्या जागांची आज घोषणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम. एस्सी. (रसायनशास्त्र) अभ्यासक्रमाच्या उपलब्ध प्रवेश जागांची आज, शुक्रवारी घोषणा होणार आहे. उद्या, शनिवारी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.

एम. एस्सी. (सर्व विषय), एम. सी. ए. (विज्ञान), एम. ए., एम. एस्सी. (भूगोल), यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमधील सर्व अभ्यासक्रम, बी. लिब., एम. लिब., बी. जे., एम. जे., एम. ए., मास कम्युनिकेशन अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. बुधवारी (दि. २७) सर्व्हर डाउन झाल्याने विद्यार्थ्यांना त्रास झाला. त्यानंतर ऑफलाईन प्रक्रिया राबविली. ऑनलाईन शुल्क भरण्यातील सर्व्हर डाउनची तांत्रिक अडचण विद्यापीठ प्रशासनाने गुरुवारी दूर केली. एम. ए., एम. कॉम., एलएल. एम., एम. एस्सी. (टेक.), गणित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे वेळापत्रक आज जाहीर होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUN 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया सुरळीत

## तांत्रिक समस्या सुटली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात प्रवेश प्रक्रिया सुरळीत झाली. बुधवारी सर्व्हर डाऊन झाल्याने विद्यार्थ्यांना



अडचणींचा सामना करावा लागला होता. परंतु, ऑफलाईन पद्धतीने ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठांतर्गत एम. ए., एम. कॉम, एम. टेक., गणित, एल.एल. एम., एम.एस्सी. आदी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या दिवशी सर्व्हर डाऊनमुळे ऑनलाईन अर्जासह प्रवेश शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांची पंचाईत झाली होती. पण, आज तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, काही विद्यार्थ्यांनी अर्जासोबत दिलेला मोबाईल क्रमांक हा आई -वडिलांकडे असल्याने ओटीपी क्रमांकासाठी विद्यार्थ्यांची धावपळ गुरुवारी दिसून आली.